सकाळ
सोमवार, १८ जानेवारी २०२१

# सावित्रीबाईंचे विचार आचरणात आणणे गरजेचे

## प्रा. डॉ. रोशनआरा शेख; लोकरंगमंच नाट्य संस्थेतर्फे टोपेवाड्यात जयंती

**सातारा, ता. १७ :** क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांना अभिवादन करताना त्यांचे शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रातील योगदान व त्यांचे धैर्य हे गुण आजच्या काळातील स्त्रियांनी आचरणात आणले पाहिजेत, असे मत येथील छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील प्रा. डॉ. रोशनआरा शेख यांनी व्यक्त केले.

लोकरंगमंच या नाट्य संस्थेच्या वतीने येथील टोपेवाड्यात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. कार्यक्रमास महाराष्ट्र विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे उपाध्यक्ष विजय मांडके, संगीत विशारद बाळासाहेब चव्हाण, लोकरंगमंचचे अध्यक्ष सुजित शेख, प्रकाश टोपे, दीपक देशमुख उपस्थित होते. प्रा. शेख म्हणाल्या, ''सावित्रीबाईंनी जे साहित्यिक मूल्य जपले, स्त्री शिकली पाहिजे यासाठी कष्ट व अन्याय सहन केला हे आजच्या स्त्रियांनी समजून घेतले पाहिजे.'' श्री. मांडके म्हणाले, ''सावित्रीबाईंनी स्त्रियांसाठी विचाराची ज्योत पेटवली. त्याची मशाल विचारानेच बनवण्याची आज नितांत गरज आहे.'' वैशाली राजेघाडगे यांनी सावित्रीबाईंच्या जीवन व कार्याची माहिती दिली. लोकरंगमंचचे उपाध्यक्ष दीपक देशमुख यांनी संस्थेच्या आजवरच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. उपाध्यक्ष प्रकाश टोपे यांनी लोकरंगमंचचे अध्यक्ष शेख यांना शुभेच्छा देऊन सावित्रीबाई व ज्योतिबा फुले यांचे कार्य विशद केले. श्री. शेख यांनी सावित्रीबाईंच्या कार्याचे महत्त्व सांगून 'करू पहिल नमन ज्योतिबाच्या' हे गीत सादर केले. कार्यक्रमास माधव सोळसकर, अजय मोरे, प्रसाद देवळेकर, शशिकांत गाडे, ॲड. शार्दुल टोपे आदी उपस्थित होते.




**सातारा : लोकरंगमंचच्या वतीने झालेल्या कार्यक्रमात वैशाली राजेघाडगे व प्रा. डॉ. रोशनआरा शेख यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.**

ग्रंथपाल
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा. जि. सातारा.

प्राचार्य
छत्रपती शिवाजी कॉलेज
सातारा.